# व्हेरिफिकेशन

**क्रिमीनल एम. ए. क. 3379 / 2025**
मी याकामी शपथेवर सांगते की :—

माझे नाव :— अम्रपाली संतोष गायकवाड,
वय :— 30 वर्षे
व्यवसाय :— घरकाम
राहणार :— कांती नगर, औरंगाबाद.

माझा विवाह सामनेवाला क. 1 सोबत 04.12.2011 रोजी झाला होता. त्यांनी मला 6 महिने सामनेवाला क. 1 याने मला चांगले वागवले. तसेच, सामनेवाला क. 2 व 3 हे ही मला मानसिक त्रास देत होते व माहेरी जायला सांगत होते. अशा परिस्थीतही मी सामनेवाला यांच्याकडे राहत असतांना सामनेवाला यांनी मला हाकलून दिले. मी स्वतः नांदवयास जाण्यास तयार होते. परंतु, सामनेवाला क. 2, 3 व 5 ते 11 हे मला नांदू देत नव्हते.

2. मी माझी तब्येत खराब झाल्यामुळे मी माहेरी गेले. परंतु त्या काळामध्ये सामनेवाला क. 1 याने माझ्यासोबत कोणताही संपर्क केला नाही व माझी तब्यत बरी झाल्यावर मी सासरी गेली असता, सामनेवाला क. 2 व 3 यांनी मला घराबाहेर काढले व घराला कुलुप लावुन घेतले. सामनेवाला क. 7 व 8 हे ही मला म्हणत होते की, हिला घरात नांदवायचे नाही. ते म्हणाले की, तु तुझी ओटी भरुन घे व हिस नांदवू नका. त्यानंतर मला कळाले की, सामनेवाला क. 1 याने दूसरा विवाह झाला आहे. नंतर मला असे कळाले की, सामनेवाला क. 1 याने दूसरा विवाह केला आहे. माझी पोटगी मिळण्यासाठी अर्ज प्रलंबित आहे. तसेच, मी सामनेवाला विरुध्द दूसरा खटला दाखल केला आहे. सामनेवाला क. 1 हा मला नांदवयास तयार होता परंतु सामनेवाला क. 7, 8 व 11 मला त्रास देत होते व मला नांदू देत नव्हते. याव्यतिरिक्त मला काही सांगायचे नाही.

साक्षीदाराची सही

अम्रपाली

दिनांक : 09 / 10 / 2025
ठिकाण : औरंगाबाद.

समक्ष

09/10/2025

**(पी. आर. पालवे)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क.12., औरंगाबाद